# जपानी पुष्परचना - भाग २५




१४ फेब्रुवारी हा दिवस सगळ्या जगात व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो. त्यासाठी या दिवसाचे महत्व सांगणारी रचना केली आहे. सोनेरी रंगाचे दोन बदाम, पॉन्सेटियाची सुंदर लाल पाने, नाजूक फर्नच्या रेषा, पिवळी शेवंती आणि फॉक्स टेलची पाने यांचा वापर केला आहे. प्रेमाचे प्रतीक म्हणून दोन बदाम आणि सध्या पॉन्सेटियाचा ऋतू असल्यामुळे लाल गुलाबाऐवजी त्याचा उपयोग केला आहे.

प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्दांपेक्षाही फुलांचे माध्यम जास्त प्रभावी आहे. म्हणूनच बहुदा फुले दिली जातात या दिवशी!!

बघा तुम्हाला आवडते आहे का व्हेलेंटाईन स्पेशल रचना!

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो पुणे शाखा

asdssd@gmail.com